माहिती हवीय?

भरत चंद्रकांत कालुवाला, मुंबई.

□ 'बेर लो मेवा गरीबों का...' हे गाणे कोणत्या चित्रपटातील? संगीतकार, निर्माता दिग्दर्शक व कलाकार कोण?

— चित्रपटः १९६९चा *पैसा या प्यार*, संगीतकारः रवी, निर्माताः जेमिनी, दिग्दर्शकः जावर सीतारामन, कलाकारः अशोककुमार, माला सिन्हा, विश्वजीत, तनुजा, शशीकला, शरदकुमार, गजानन जागिरदार, आशिमकुमार, ललिताकुमारी, प्रवीण पॉल, उमेश शर्मा, अभिमन्यू सरितादेवी.

□ *सती सावित्री* केव्हा प्रदर्शित झाला होता? कलाकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

— *सती सावित्री* या नावचे तीन चित्रपट आतापर्यंत निर्माण झाले आहेत. १९३२च्या *सती सावित्री*चे प्रमुख कलाकार-गोहर, भगवान दास, अदजानिया, धोरी, शांता, निर्माता-दिग्दर्शकः चंदूलाल शहा. संगीतः झंडेखान. १९६४ला दुसरा *सती सावित्री* निर्माण झाला होता. कलाकारः अंजली देवी-महिपाल, तिवारी, बी.एम.व्यास, मोहन चोटी, जीवन, अरुणा ईराणी, निरंजन शर्मा, निर्माताः बी.आर.प्रॉडक्शन, दिग्दर्शकः शांतीलाल सोनी, संगीतः लक्ष्मीकांत-प्यारेलाल. १९८१ साली तिसरा *सती सावित्री* तेलगुतून हिंदीत डब होऊन आला होता. कलाकारः एन.टी.रामाराव, कृष्णा राजू, कांताराव, प्रभाकर रेड्डी, वाणी लक्ष्मी, पुष्पाकुमारी, निर्माता-दिग्दर्शकः पी.ए.सुब्बाराव, संगीतः एस.एन.त्रिपाठी.

□ *पारसमणी* कधी प्रदर्शित झाला होता? कलाकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

— *पारसमणी* १९६३ला आला होता. कलाकारः महिपाल, गीतांजली, मनहर देसाई, हेलन, नलिनी चोणकर, मारुती, निर्माताः मूव्हीलँड, दिग्दर्शकः बाबूभाई मिस्त्री, संगीतः लक्ष्मीकांत-प्यारेलाल या जोडीने संगीत दिलेला हा पहिला चित्रपट.

अनिकेत मारुती कोळी, नवघर.

□ शीबाचा पहिला चित्रपट कोणता?

— *ये आग कब बुझेगी.*

□ लीना चंदावरकरचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?

— लीनाचा पहिला चित्रपट *मन का मीत*. नायकः सुनील दत्तचा भाऊ सोम दत्त.

□ रामेश्वरीचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?

— रामेश्वरीचा पहिला चित्रपट *दुल्हन वही जो पिया मन भाए*. नायकः प्रेमकिशन.

□ नरगिसचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?

— १९३५चा *तलाश-ए-हक* नरगिसचा पहिला चित्रपट. यात ती बालतारका होती. १९४१चा *तकदीर* तिने नायिकेची भूमिका केलेला पहिला चित्रपट. यात मोतीलाल तिचा नायक होता.

□ किरणकुमारचा पहिला चित्रपट कोणता?

— *राजाकाका.*

□ सतीश शहाचा पहिला चित्रपट कोणता?

— अरविंद देसाईचा *अजिब दास्तान*.

नरेश राजाराम कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ दिलीपकुमार व वैजयंतीमाला यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?



वैजयंतीमाला आणि दिलीपकुमार *पैगाम*मध्ये

— *देवदास, नया दौर, मधुमती, पैगाम, गंगा जमना, लीडर, संघर्ष.*

□ जॅकी श्रॉफचा पहिला गाजलेला चित्रपट? नायिका कोण?

— जॅकीचा पहिला गाजलेला चित्रपट *हिरो*. नायिका मीनाक्षी शेषाद्री. तिचादेखील हा पहिलाच गाजलेला चित्रपट.

मारुती गणपत कोळी, नवघर.

□ राजकुमारचा पहिला चित्रपट कोणता?

— १९५२चा *रंगीली*.

□ संजीवकुमारचा पहिला हिट चित्रपट कोणता?

— १९७०चा *खिलौना*.

नरेश राजाराम कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ राज कपूर-नरगीस ही जोडी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र चमकली?

— *आग, अंदाज, आवारा, बरसात, जान पहचान, प्यार, अंबर, अनहोनी, आशियाना, बेवफा, आह, धून, पापी, श्री ४२०, चोरी चोरी, जागते रहो.*

□ नरगीसने नायिकेची भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?

— चित्रपटः *तकदीर*, नायकः मोतीलाल.

□ कोणत्या चित्रपटातील भूमिकेसाठी नरगीसला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला?

— *रात और दिन.*

कृष्णा नारायण तुर्रे, कर्जत आंबराई.

□ रीना रॉयचा पहिला चित्रपट कोणता?

— *जरूरत.*

□ ट्विंकल खन्नाचा पहिला चित्रपट कोणता?

— *बरसात.*

□ अनुपम खेरचा पहिला चित्रपट कोणता?

— *सारांश.*

□ रणधीर कपूरचा पहिला चित्रपट कोणता?

— *कल आज और कल* या पहिल्याच चित्रपटात तो नायकाबरोबर दिग्दर्शकदेखील बनला.

नरेश राजाराम कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ बलराज सहानींचा पहिला चित्रपट कोणता?

— *धरती के लाल.*

□ दिलीपकुमारचा पहिला चित्रपट कोणता? नायिका कोण?

— दिलीपकुमारचा पहिला चित्रपट *ज्वार भाटा*. नायिका मृदुला.

सौ. सुधा अ. कोर्टीकर, पंढरपूर.

□ अशोक सराफचा पहिला चित्रपट कोणता?

— *दोन्ही घरचा पाहुणा.*

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ मनोजकुमारने नूतन व वहिदा रहमान यांच्याबरोबर कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?

— *यादगार* या चित्रपटात नूतनबरोबर, *पत्थर के सनम* व *नीलकमल* या चित्रपटात वहिदा रहमानबरोबर.

संतोष च. हालकुडे, कुर्डुवाडी.

□ राज बब्बर, स्मिता पाटील व नाना पाटेकर यांनी कोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

— *आज की आवाज.*

अशोक परशुराम परब, ठाणे (प.)

□ विजय आनंदनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *नौ दो ग्यारह.*

□ मुंबई दूरदर्शनवर प्रदर्शित झालेला पहिला चित्रपट कोणता?

— *तिसरी कसम.*